## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :-
१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २८/०३/२०१३ रोजी प्राप्त प्रकरण व त्यासोबतची कागदपत्रे.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२७/२०१३/जा.२७७, दिनांक ३०/०३/२०१३, १५/०४/२०१३ व ०३/०५/२०१३.
३) पोलिस निरिक्षक, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २२/०४/२०१३ रोजी प्राप्त अभिवेदन.
४) टँकर क्र. एमएच-०४-डीके-७६८९ चे मालक तथा वाहतुकदार शेख हजरत हुसेन यांचे दिनांक ३०/०४/२०१३ रोजी प्राप्त लेखी निवेदन.
५) टँकर क्र. एमएच-०४-डीके-७६८९ चे साठा मालक म्हणून मे. जे.व्ही. केम (इंडिया) यांचे दिनांक ०६/०५/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त विनंती अर्ज.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२७/२०१३/जा. ४१२
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : ०६/०५/२०१३.

## अंतरीम आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

दिनांक २०/०३/२०१३ रोजी या कार्यालयास सेक्टर १९ अे, गाडी अड्डा, वाशी येथे टँकरमधून विविध प्रकारच्या ऑईलची अवैधरित्या खरेदी, विक्री व चोरी केली जात असल्याबाबत मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार, या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी तसेच उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांचे पथक हे पंचांसह सुमारे रात्री ११.०० वाजता सेक्टर १९ अे, वाशी गाडी अड्डा, वाशी येथे लॅपटॉप व प्रिंटरसह शासकीय वाहनाने पोहोचले. सदर ठिकाणी मे. एलमॅक्स नावाची खाद्यतेलाची कंपनी असून सदर कंपनीच्या गेट समोरील रस्त्याच्या दुतर्फा अनेक टँकर उभे असल्याचे अधिकाऱ्यांना पंचासमक्ष आढळले. सदर रस्त्याच्या डाव्या बाजूला उभ्या असलेल्या टँकर क्र. एमएच ०४ डीके ७६८९ च्या पाठीमागे चार इसम अंधारात उभे असल्याचे दिसल्याने पंच व अधिकारी लगेचच सदर टँकरजवळ पोहचले. टँकरजवळ पोहचल्यानंतर सदर टँकरच्या डाव्या बाजूस असलेल्या वॉल्वमधून पाईपच्या सहाय्याने

0002
टँकरमधील द्रवपदार्थ पत्र्याच्या डब्यात काढत असल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष दिसून आले. पथकातील अधिकाऱ्यांनी उपस्थित इसमांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता त्यापैकी तीन इसम हे हात झटकून झाडी झुडपातून पसार झाले. पथकातील अधिकाऱ्यांनी पाठलाग केला असता तिन्ही इसम हे अंधाराचा फायदा घेऊन पळून जाण्यास यशस्वी झाले. पथकाने विजेरीच्या प्रकाश झोतामध्ये सदर वॉल्वची पाहणी केली असता, वॉल्वचे सील तोडण्यात आल्याचे दिसून आले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी टँकर क्र. एमएच ०४ डीके ७६८९ जवळ उभा असलेल्या चौथ्या इसमास ताब्यात घेऊन त्याचेकडे अधिक चौकशी केली असता, त्याने त्याचे नांव राजेंद्रप्रसाद दयाराम भारती असल्याचे सांगून तो सदरहू टँकरचा ड्रायव्हर असल्याचे सांगितले.

त्यानंतर अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सदर रस्त्याच्या दूतर्फा घटनास्थळी उभे असलेले इतर टँकर क्र.१) एमएच ०४ इएल ३१११, २) डीएन ०९ ई ९४४७, ३) एमएच ०४ सीजी ४३१९, ४) एमएच ४३ यू ४८५८, ५) एमएच ०४ ईबी ५९८८, ६) एमएच ०४ ईबी ५०४८, ७) एमएच ४३ ई ९५९४, ८) एमएच ०६ ओसी १५७४, ९) एमएच ०४ बीयू ६३३४ व १०) एमएच ४६ एफ ३७५३ असे एकूण १० टँकर उभे असल्याचे आढळले. अधिकाऱ्यांनी सदर टँकरचे तपासणीस सुरुवात केली. नमूद दहा टँकरचे चालक हे तपासणीचे वेळी टँकरजवळ उभे असल्याचे दिसून आले. अधिकाऱ्यांनी संबंधित टँकरचालकांकडे अधिक चौकशी केली असता टँकर क्र. एमएच ०४ इएल ३१११, डीएन ०९ ई ९४४७, एमएच ०४ सीजी ४३१९, एमएच ०४ बीयू ६३३४ व एमएच ४३ ई ९५९४ हे पाच व यापूर्वी तपासल्यापैकी टँकर क्र. एमएच ०४ डीके ७६८९ असे मिळून एकूण सहा टँकर भरलेले असल्याचे तपासणीत आढळून आले. तसेच उर्वरित पैकी टँकर क्र. एमएच ४३ यू ४८५८, एमएच ०४ ईबी ५९८८, एमएच ०४ ईबी ५०४८, एमएच ०६ ओसी १५७४ व एमएच ४६ एफ ३७५३ असे एकूण पाच टँकर रिकामे असल्याचे संबंधित टँकर चालकाने अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले. तपासणीमध्ये भरलेले टँकरची अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष तपासणी केली असता सदरचे सहा टँकरपैकी टँकर क्र. डीएन ०९ ई ९४४७ हा टँकर वगळून उर्वरित टँकर क्र. एमएच ०४ इएल ३१११, एमएच ०४ सीजी ४३१९, एमएच ०४ बीयू ६३३४, एमएच ४३ ई ९५९४ व एमएच ०४ डीके ७६८९ या पाचही टँकरच्या वॉल्व बॉक्सचे सील तुटल्याचे आढळून आले.

तद्नंतर सदर टँकरजवळ उभा असलेल्या चौथ्या इसमास ताब्यात घेऊन पहिल्या टँकर जवळील परिसराची झाडझडती घेतली असता उभे असलेल्या टँकरच्या बाजूला झाडी झुडपात एकूण २२० लिटर्स क्षमतेचे १४ लोखंडी पिंपे व २०० लिटर्स क्षमतेचे सहा प्लॅस्टिकची पिंपे झुडपांमध्ये लपवून ठेवल्याचे आढळून आले. सदर पिंपांची अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष तपासणी केली असता, १४ लोखंडी पिंपांपैकी १३ लोखंडी पिंपे व सहा प्लॅस्टिकची पिंपे रिकामे असल्याचे व एक लोखंडी पिंप सॉल्वंट सदृश द्रवपदार्थाने भरलेला असल्याचे आढळून आले. अधिकाऱ्यांनी लगेच सदर पिंपे ताब्यात घेतली. त्यानंतर पुन्हा परिसराची तपासणी केली असता, सदर ठिकाणी टेम्पो क्र. एमएच

४३ अेडी ३४७७ उभा असल्याचे आढळले. सदर टेम्पोची पाहणी केली असता टेम्पोचे सर्व दरवाजे बंद असून टेम्पोमध्ये कुणीही इसम/चालक उपस्थित नसल्याचे दिसून आले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष टेम्पोच्या मागील दरवाजा उघडला असता सदर टेम्पोमध्ये २२० लिटर क्षमतेचे तीन निळया रंगाची लोखंडी पिंपे आढळून आले. सदर पिंपांची तपासणी केली असता, सदर तिन्ही पिंपे सॉल्वंट सदृश द्रवपदार्थाने भरले असल्याचे आढळून आले. सदरचा मुद्देमाल अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष ताब्यात घेतला. त्यानंतर अधिकाऱ्यांना पंचासमक्ष वर नमूद टेम्पोच्या पाठीमागे उभ्या असलेल्या कंपनी बसेस जवळ फुटपाथवर २०० लिटर्स क्षमतेचे आढळून आलेल्या दोन निळया रंगाच्या पिंपापैकी एक प्लॅस्टिकचे पिंप अर्धवट भरलेले तसेच दुसरे लोखंडी पिंप हे सॉल्वंट सदृश द्रवपदार्थाने अर्धवट भरलेले आढळले. तसेच ३५ लिटर क्षमतेचे ५ निळया रंगाचे रिकामे प्लॅस्टिकचे कॅन आढळले. सदरचा सर्व आढळून आलेला मुद्देमाल अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष जागीच ताब्यात घेतला.

त्यानंतर पंचांसह अधिकारी टँकर क्र. एमएच ०४ डीके ७६८९, टँकर क्र एमएच ०४ इएल ३१११, टँकर क्र. एमएच ०४ सीजी ४३१९, टँकर क्र. एमएच ४३ यू ४८५८, टँकर क्र. एमएच ०४ ईबी ५९८८, टँकर क्र. एमएच ०४ ईबी ५०४८, टँकर क्र. एमएच ४३ ई ९५९४, टँकर क्र. एमएच ०६ अेसी १५७४, टँकर क्र. एमएच ०४ बीयू ६३३४, टँकर क्र. एमएच ४६ एफ ३७५३ व टँकर क्र. डीएन ०९ ई ९४४७ या ११ टँकरची तपासणी केली व घटनास्थळी उपस्थित ड्रायव्हर/क्लिनर यांनी पंचांसमक्ष दिलेल्या स्वतंत्र जबाबात, सेक्टर १९ अे, दाणाबंदर, वाशी गाडी अड्डा, या ठिकाणी टँकरमधील साठा हा अवैधरित्या धंदा करणारे दाढी यादव नामक इसम (पूर्ण नांव माहित नाही), राजबहादूर यादव नामक इसम (पूर्ण नांव माहिती नाही) व प्रकाश दळवी नामक इसम (पूर्ण नांव माहित नाही), यांना टँकर मधील सुमारे ४० ते ५० लिटर माल काढून विक्री करताना अधिकाऱ्यांनी त्यांना पकडले. दरम्यान रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन दाढी यादव, राजबहादूर यादव व प्रकाश दळवी हे तिघेही अड्ड्यावरुन पसार झाले. अधिकाऱ्यांनी टँकरमधील मालाची व मालाच्या बिलाबाबत चौकशी केली असता, त्यांना बिल सादर केले. अधिकाऱ्यांनी घटनास्थळी सुरु असलेल्या अनाधिकृत अड्ड्याबाबत माहिती विचारली असता सदरचा धंदा हा मागील तीन महिन्यापासून चालू असून सदर ठिकाणी ते नियमित टँकर भरल्यानंतर टँकरमधील त्यांचेकडून घेतलेल्या चोरीच्या मालाचे ४० ते ५० लिटर करिता रुपये ६०० ते ७०० त्यांना देतात असे अधिकाऱ्यांना सांगितले. सदर चोरी पगार कमी असल्याकारणाने, स्वतःच्या फायदयाकरिता करीत असतात, असे नमूद केले.

त्यानंतर पंचांसह अधिकारी टँकर क्र. डीएन ०९ ई ९४४७ जवळ गेले व सदर टँकरची तपासणी केली. सदर टँकरमध्ये एक इसम बसलेला असल्याचें आढळले. त्यास अधिकाऱ्यांनी स्वतःची ओळख करुन देऊन त्याचे नांव गांव विचारले असता, त्याने त्याचे नांव जिशान मुरशीलखान हैदर, असे सांगून टँकर क्र. डीएन ०९ ई ९४४७ चे मालक अजय मल्होत्रा, राहणार- चेंबूर, भ्रमणध्वनी क्रमांक-९८२११६४५२० यांचेकडे मागील सहा वर्षापासून

ड्रायव्हर म्हणून काम करीत असून, त्याचा ड्रायव्हींग लायसन क्र. एमएच ०१ २००८००७१४९८ असा आहे. त्याला मासिक रुपये १००००/- पगार मिळतो. आज दिनांक २१.०३.२०१३ रोजी मे. गॅलेक्सी सरफेक्टेन्स लि., व्ही २३, एमआयडीसी, तळोजा येथून गॅलक्सी एलईएस १७० या द्रवरुप पदार्थाने भरलेला टँकर हिंदूस्थान युनिलिव्हर लि. सिएलएस-२, युनिट नं. ८, प्लॉट नं. १, सेक्टर १ अे, सिडकूल, हरिव्दार, उत्तरांचल येथे घेऊन जाण्याकरिता निघालो. सदर प्रवासाचे येणाऱ्या खर्चाकरिता ॲडव्हान्स देण्याकरिता श्री. ओमप्रकाश यादव मॅनेजर, घटनास्थळी येऊन खर्चाकरिता ॲडव्हान्सचे पैसे देऊन गेले. अधिकाऱ्यांनी अधिक चौकशी केली असता, सदर टँकरमधील मालाबाबतचे बील त्याने अधिकाऱ्यांना दाखविले. सदर बिलात नमूद सीलींग कम्पार्टमेंट नं. १ सील नंबर ४३२०५, सीलींग कम्पार्टमेंट नं. २ सील नंबर ४३२०२, सीलींग कम्पार्टमेंट नं. ३ सील नंबर ४३२४६, सीलींग कम्पार्टमेंट नं. ४ सील नंबर ४३२२५, सीलींग कम्पार्टमेंट नं. ५ सील नंबर ४३२७९ व सीलींग बॉटम वॉल्व कव्हर सील नंबर ४३२७६, ४३५६७, सदर प्रमाणे टँकरला सील असल्याबाबतचे कागदपत्र अधिकाऱ्यांना दिले. त्यानुसार अधिकाऱ्यांनी सील असल्याबाबत खात्री केली तसेच बॉटम वॉल्व हॅंडल सील नं. ४३२५६ हे वॉल्व हॅंडलच्या आत मध्ये असल्याकारणाने ते अधिकाऱ्यांना तपासणीकरिता पाहता आले नाही. तसेच टँकर क्र. डीएन ०९ ई ९४४७ चे परिवहन विभागाकडील नोंदणीकृत प्रमाणपत्र, फिटनेस प्रमाणपत्र क्र. ००२७४५३, यु.टी. ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ दादरा ॲण्ड नगर हवेली यांची रोड टॅक्स पावती क्र.२३५३७३, सचिव, राज्य परिवहन प्राधिकारी, दादरा ॲण्ड नगर हवेली यांनी दिनांक ११.०८.२०१२ रोजी दिलेले नॅशनल परमीट क्र.एनपी/डीएन/१/०८२०१२/२२१८२ दिनांक २४.०८.२०१३ पर्यंत वैध असलेले. इत्यादी कागदपत्र त्यांनी अधिकाऱ्यांना दाखविली व तसा त्याचा जबाब अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष नोंदविला. सदर टँकर हे घटनास्थळी नोंदविण्यात आलेल्या जबाबानुसार टँकर चालक हे प्रवास खर्च घेण्यासाठी या ठिकाणी आले असल्याचे तसेच सदर टँकरचे सील अद्यावत असल्याचे अधिकाऱ्यांचे निदर्शनास आल्याने सदर टँकर हे जप्त करण्यात आले नाही.

त्यानंतर पथकातील अधिकाऱ्यांनी अेपीएमसी पोलीस ठाणे येथे जाऊन रितसर स्टेशन डायरीव्दारे खबर दिली. त्यानुसार सदर घटनास्थळी अेपीएमसी पोलीस ठाणे येथील सहाय्यक पोलीस निरिक्षक श्रीमती मोकळीक यांनी त्यांचे सहकारी पोलीसांसह भेट दिली. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष त्यांना सदर घटनेची रितसर माहिती व प्रत्यक्ष घटनास्थळावर होणारा गैरव्यवहार त्यांच्या नजरेस आणून दिला. मध्यरात्र झाल्याने वर नमूद टँकर तसेच अड्डयावर आढळून आलेले लोखंडी, प्लॅस्टीक पिंपामधील सॉल्वंट सदृश साठयाची तपासणी करणे अशक्य झाले. सबब, सुर्योदय होईपर्यंत पंचनामा पुढे तसाच सुरु ठेवण्यात आला.

सुर्योदय झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष वर नमूद दहा टँकर व एक टेम्पो तसेच अनाधिकृत अड्डयावर आढळलेले पिंपांची तपासणी केली. त्यामध्ये ऑईल व सॉल्वंट सदृश द्रवपदार्थ आढळून आला. असे अधिकाऱ्यांचे

व पंचांचे मत झाले. दरम्यान शिधावाटप कार्यालय क्र. ४१ फ, वाशी येथील प्रभारी शिधावाटप अधिकारी श्रीमती शैला प्रदीप कदम या उपस्थित झाल्या त्यांना सदर घटनेची रितसर माहिती देण्यात आली.

सदर धाडीत घटनास्थळी १० टँकर, १ टेम्पो व अनधिकृत अड्ड्यावर मिळून आलेला अनधिकृत साठा तसेच टँकरमधील साठा पंचांसमक्ष घटनास्थळी जागीच जप्त करुन रुपये १,८०,००,४२९/- एवढया किमतीचा मुद्देमाल अधिकाऱ्यांनी पोलीसांच्या ताब्यात दिला. तसेच धाडीत जप्त करण्यात आलेल्या लोखंडी, प्लॅस्टिक, तसेच टेम्पोमधील लोखंडी पिंपातील सॉल्वंट सदृश साठयाचे नमुने अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष घेऊन पंचांच्या सहीनिशी जागीच सिलंबद करण्यात आले.

अशाप्रकारे, इसम नामे दाढी यादव, राजबहादूर यादव व प्रकाश दळवी यांनी सॉल्वंट सदृश द्रवपदार्थ, काळे तेल इत्यादी पेट्रोलजन्य पदार्थ व खाद्यतेल अनाधिकृतपणे गैरमार्गाने टँकर ड्रायव्हरशी संगनमताने चोरी करुन प्रत्येक टँकर मधील सुमारे ५० ते ८० लिटर साठा काढून तो प्लॅस्टिकच्या तसेच पत्र्याच्या पिंपांमध्ये साठवूण त्याची गैरमार्गाने तस्करी करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगल्याचे धाडीत निष्पन्न झाले आहे. सबब वर नमूद इसम नामे दाढी यादव, राजबहादूर यादव व प्रकाश दळवी वर नमूद तक्त्यातील दहा टँकरचे चालक व मालक तसेच सदरचे टँकर ज्या ट्रान्सपोर्ट कंपनीत चालविले जातात त्या कंपनीचे मालक/भागीदार/संचालक या सर्वांनी संगनमताने प्रचंड मोठ्या प्रमाणात अनधिकृत पेट्रोलजन्य पदार्थांचा बेकायदेशीर अड्डा चालवित असल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द झाल्याने, संबंधितांनी, (१) जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व १० (२) दि महाराष्ट्र सॉल्वंट रेफिनेट ॲण्ड स्लोप (लायन्ससिंग) ऑर्डर, २००७ एमएफओ या सॉल्वंटचा शासन निर्णय क्रमांक-१००९/६९५/प्र.क्र. २२२/नापु.२४, दिनांक १२/७/२०१०, (३) ल्यूब्रिकंट ऑईल्स ॲण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय ॲण्ड डिस्ट्रब्यूशन रिग्यूलेशन) ऑर्डर १९८७, (४) महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार आदेश, १९९८ तसेच (५) भारतीय दंड विधान संहिता चे कलम ३७८, ३७९ व ४२० चा भंग केल्यामुळे त्यांचेविरुद्ध ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ६३/२०१३, दिनांक २२/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी केलेली असून, जप्त करण्यात आलेला उपरोक्त मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये ? याबाबत वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दिनांक ०८/०४/२०१३, ३०/०४/२०१३ व २९/०५/२०१३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

NG & DIRECTOR CIVIL SUPPLIES D OFFICE MUMBAI

0006 पोलिस निरिक्षक, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांनी वाचावे क्र. ३ अन्वये सादर केलेल्या अभिवेदनात, एकुण १० टँकर व १ टेम्पो जप्त करण्यात आले आहेत. जप्त करण्यात आलेल्या एकुण १० टँकरपैकी टँकर क्रमांक एमएच-०४-ई-३१११ व टँकर क्रमांक एमएच-०४-बीयु-६३३४ मधुन मोठ्या प्रमाणात लिकेज होत असुन सदरचे लिकेज पोलिसांनी बंद करण्याचा प्रयत्न केला पंरतु सदरचे लिकेज बंद झाले नाही. तसेच टँकर क्रमांक एमएच-०४-डीके-७६८९ मध्ये ९७५० कि.ग्रॅ. मिथेनॉल असुन ते अति ज्वलनशिल व विषारी असल्याने ते धोकादायक आहे. तरी उपरोक्त जप्त तीन टँकरमधील जप्त मुद्देमाल लवकरात लवकर डिस्पोझल करण्यात यावे, अशी विनंती केली.

उपरोक्त नमूद तीन टँकरपैकी टँकर क्रमांक एमएच-०४-ई-३१११ या टँकरमध्ये मे. पारस ल्युब्रिकंट्स लि. या कंपनीचा व्हीजी १०० ऑईल, टँकर क्रमांक एमएच-०४-बीयु-६३३४ या टँकरमध्ये मे. एम्को लि. ठाणे यांचा सुपर ट्रान्सफार्मर ऑईल तसेच टँकर क्रमांक एमएच-०४-डीके-७६८९ या टँकरमध्ये मे. जेव्हीकेएम इंडिया या कंपीनाचा मिथेनॉलचा साठा असल्याचे पंचानाम्यात नमूद आहे. सदर साठामालकांपैकी मे. पारस ल्युब्रिकंट्स लि. यांना वगळता उर्वरीत साठामालक हे दिनांक ०८/०४/२०१३ व ३०/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सद्यस्थितीत जप्त साठ्याच्या नमून्यांचा रासायनिक पृथःकरण अहवाल आजमितीस अप्राप्त असल्याने नमूद साठा हा साठ्यासंबंधीच्या कागदपत्रानुसार आहे किंवा कसे ? याची खातरजमा करणे शक्य झाले नाही. तथापी, उपरोक्त साठयापैकी टँकर क्रमांक एमएच-०४-डीके-७६८९ या टँकरमधील साठा हा मिथेनॉल असल्यास तो ज्वलनशिल असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मे. जे.व्ही. केम (इंडिया) या कंपनीचे वाचावे क्र. ५ अन्वये प्राप्त विनंती अर्जानुसार त्यांच्या कंपनीने मे. अफसर ट्रान्सपोर्ट या वाहतुकदाराच्या टँकर क्र. एमएच-०४-डीके-७६८९ मार्फत मिथेनॉलचा साठा हा मे. अंबिका फॉर्मासिटीकल्स ॲण्ड केमिकल्स, कोल्हापुर येथे पाठविण्यासाठी भरला आहे. सदर मिथेनॉलचा साठा हा जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत येत नाही. तसेच सदरचा साठा हा अतिज्वलनशिल असल्याने तो जास्त काळासाठी टँकरमध्ये ठेवणे योग्य नाही. तरी सदरचा साठा सुरक्षितरित्या वाहतुक करुन उपभोक्त्यास प्रत्यक्ष वापरासाठी देण्याकरिता मुक्त करण्याची विनंती केली.

सदर प्रकरणी सुनावणीची प्रक्रिया पूर्ण होऊन तसेच न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कालिना, सांताक्रुझ यांचेकडून पृथःकरण अहवाल प्राप्त होईपर्यंत अंतीम निकालपत्र देण्यास विलंब लागणार आहे. प्रस्तुत प्रकरणी, पोलिस निरिक्षक, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांनी केलेल्या विनंतीनुसार टँकर क्रमांक एमएच-०४-डीके-७६८९ या टँकरमध्ये मिथेनॉल असुन ते अति ज्वलनशिल व विषारी असल्याने ते धोकादायक असल्याचे नमूद केले आहे. सबब, टँकर क्रमांक एमएच-०४-डीके-७६८९ हे टँकर एपीएमसी, वाशी येथील पार्किंगमध्ये

उघड्यावर उभा असून सदरहू टँकरमधील साठा हा ज्वलनशिल असल्यास, त्यामधून होणाऱ्या गळतीमुळे दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी टँकर क्रमांक एमएच-०४-डीके-७६८९ या टँकरमधील साठ्यासंबंधीचे पुरावादर्शक कागदपत्रांचे अवलोकन करुन संबंधित साठा मालकास बंधपत्र घेऊन तसेच सदर प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याच्या अधिन राहून अंतरीम आदेश पारित करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

<u>अंतरीम आदेश</u> :-

१) टँकर क्रमांक एमएच-०४-डीके-७६८९ मधील साठा हा साठ्यासंबंधीचे पुरावादर्शक कागदपत्रांचे अवलोकन करुन मे. जे.व्ही. केम (इंडिया) या कंपनीस बंधपत्र घेऊन परत करण्यात यावा.

२) प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या वरील मुद्देमालाव्यतीरिक्त शिल्लक राहीलेल्या मुद्देमालाबाबतचे आदेश या प्रकरणी सुनावणीची प्रक्रिया पूर्ण होऊन पृथ:करण अहवाल प्राप्त झाल्यानंतर निर्गमित करण्यात येतील.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टँकर क्र.एमएच ०४ डीके ७६८९ चा मालक तथा वाहतुकदार शेख हजरत हुसेन
२) टँकर क्र.एमएच ०४ डीके ७६८९ मधील संबंधित साठा मालक मे. जे.व्ही. केम (इंडिया)
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल <u>विनाविलंब</u> या कार्यालयास सादर करावा.

२) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.

३) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.